**नि. फौ. ख. क्र.४३५/२०२२**

सरकार वि. अनील वणवे व इतर.

**नि.क्र.२०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव– समीर मल्हारी नरुटे ,**

वय–३४ वर्षे, व्यवसाय–शेती,

रा.काझड, ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

मी आरोपींना ओळखतो. दि.१५/०१/२०२२ रोजी आरोपी व आमचेमध्ये किरकोळ वाद झाला होता. या व्यतिरिक्त काही झाले नाही. असे काही घडले नाही की, आरोपींनी संगनमत करून मला शिवीगाळ करून मारहाण केली. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर नाही. **सहीस नि.क्र.२१** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

*(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकिलांनी उलटतपासात ग्राहय असलेले प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी देण्यात आली.)*

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५/०१/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास मौजे जळोची, ता.बारामती, जि.पुणे गावचे हद्दीत दोन गुंठे जागा विकत घेतल्याने ती जागा पाहणेसाठी मी व आमचे गावातील हनुमंत दामोदर नरुटे असे दोघेजण मौजे जळोची येथील जागा पाहण्यासाठी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, ती जागा पाहणी झाल्यानंतर आम्ही दोघे परत घरी येण्यासाठी दुपारी १६.०० वाजता सुमारास तेथुन मोटार सायकल स्प्लेंडर ही वरती येत असताना आम्हास तहान लागल्याने आम्ही लाकडी गावच्या

हद्दीत कळस काझडकडे जाणा–या चौकात थांबलो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आम्हाला तहान लागल्याने पाणी घेण्यासाठी वणवे यांच्या दुकानाजवळ दुपारी १६.३० वाजताच्या सुमारास थांबलो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी दुकानाशेजारी इसम नामे अनिल गेना वणवे हा तेथे थांबलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तो शिगारेट ओढत असताना माझा चुलता नामे हनुमंत दामोदर नरुटे यांच्या तोंडावर शिगारेटचा धुर मारला त्यावेळी मी त्यास तु आमचे बापुचे तोंडावर धुर का मारला असे विचारले असता काहीएक कारण नसताना मला शिवीगाळ करू लागला व हाताने मारहाण करण्यास सुरूवात केली. हे म्हणणे खरे नाही की, त्याने त्याचे मोबाईलवरून फोन करून सचिन दत्तु वणवे, किरण दत्तु वणवे, आशुतोष अनिल वणवे यांना बोलावून घेवुन ते त्यांच्या चारचाकी गाडी नं.६१०७ हिने येऊन सचिन दत्तु वणवे व किरण दत्तु वणवे यांनी मला धरले व हाताने मला मारहाण करण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सचिन दत्तु वणवे याने माझ्या तोंडावर झा–याने मला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी किरण वणवे, आशुतोष वणवे यांनी मला दोघांनी धरले त्यावेळी अनिल वणवे याने तोंडावर लाथ मारून लाकडी काठीने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये मला पाठीवर तसेच डाव्या हाताचे दंडावर तसेच डाव्या पायाचे मांडीवर मार लागल्यामुळे मी लागलीच खाली पडलो. हे म्हणणे खरे नाही की, भांडणामध्ये माझ्या गळयातील चैन पडुन गहाळ झाल्याने मी लागलीच वालचंदनगर पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आलो असता मला पोलीस ठाणे अंमलदार यांनी मेडीकल यादी दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी प्राथमिक आरोग्य केंद्र लासुर्णे येथे प्राथमिक उपचार केले, त्यानंतर मी लागलीच पोलीस स्टेशनला येऊन तक्रार दिली. आता मला माझ्या फिर्यादी जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. तो मी पोलीसांना सांगितला नाही. पोलीसांनी तसा का नमूद केला याचे कारण मला सांगता येत नाही. आरोपींचे व माझे न्यायालयाबाहेर आपसी तडजोडीने मिटलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे व आमचे मिटले असल्यामुळे आरोपींना वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.आर.आर.बनसोडे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

**३.** जखमा मला गाडीवरून पडल्यामुळे झाल्या. आरोपींविरुध्द माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**( ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

**दि.२७/०८/२०२६** इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.